# प्रकरण चौथे

# ' देह जावो अथवा जावो ' या कादंबरीचे

# वाङ्मयीन विशेष

-: प्रकरण चौथे :-

## ' देह जावो अथवा जावो ' या कादंबरीचे वाङ्‌मयीन विशेष

- प्रस्तावना
- वातावरण निर्मिती
- ' देह जावो अथवा जावो ' या कादंबरीतील वातावरण निर्मिती
- निवेदन पद्धती
- ' देह जावो अथवा जावो ' या कादंबरीची निवेदन पद्धती
- भाषा शैली
- ' देह जावो अथवा जावो ' या कादंबरीची भाषा शैली
- संवाद
- काव्यपंक्तींचा वापर
- उपमा, वाक्प्रचार, म्हणी, प्रतिमा - प्रतिकांचा वापर
- अन्य भाषेचा वापर
- शिव्यांचा वापर
- समारोप
- संदर्भ ग्रंथ

# प्रकरण चौथे

## ' देह जावो अथवा जावो ' या कादंबरीचे वाङ्मयीन विशेष

**प्रस्तावना** :-

मागील प्रकरणात ' देह जावो अथवा जावो ' या कादंबरीचा व्यक्तिरेखाच्या दृष्टीने अभ्यास केला. या ठिकाणी आपणाला या कलाकृतीचा वाङ्मयीन दृष्टिकोनातून विचार करावयाचा आहे. या वाङ्मयीन विशेषांमध्ये कादंबरीच्या कथानकाची मांडणी, व्यक्तिचित्रण, वातावरण निर्मिती, निवेदन शैली आणि भाषाशैलीच्या दृष्टिकोनातून अभ्यास करावयाचा आहे.

अशा विविध वैशिष्टयांचा अभ्यास या प्रकरणात करणे हा मुख्य उद्देश आहे. यामुळे कादंबरीच्या वाङ्मयीन मांडणीविषयीचा आपणास परिचय होण्यास मदत होते. तिचा आशय लवकर कळत असतो. त्यासाठी लेखकाला कलाकृतीचा मांडणीसाठी विशिष्ट भाषा वापरावी लागते. कारण व्यवहाराची भाषा ही वाङ्मयीन लेखनासाठी वापरली जात नाही. ही भाषा आलंकारिक आणि वैशिष्टयपूर्ण असते. या दोघांतला फरक स्पष्ट करताना भालचंद्र नेमाडे म्हणतात, " ज्याला आपण बोल भाषा म्हणजे नेहमीच्या बोलण्यातली व्यवहाराची भाषा अशी संज्ञा वापरली, ती समाजाच्या नानाविध क्षेत्रांमध्ये इतक्या प्रचंड प्रमाणात वापरली जाते, की तिच्या मानाने साहित्याची भाषा फार किरकोळ ठरते. संदेशवहनाचे क्षेत्र व्यवहाराच्या भाषेत विशाल ठरले. तरी ते प्रायः साधनरूप असते.साहित्यातील काही प्रकारांत हे साधन म्हणून वापरले जाते. तरी साधन-साध्य हा भेद नेहमीच टिकत नाही. आणि भाषेसारख्या लवचीक साधनाचे साध्याशी एकरूप झालेले आढळते."[१]

याचा अर्थ असा की, वाङ्मयाच्या भाषेपेक्षा व्यवहाराच्या भाषेचा अधिक वापर होतो. तरी देखील वाङ्मयाच्या भाषेमुळे वाचकांना विशेष अनुभव मिळतो. याचा प्रत्येय आपणास प्रस्तुत कादंबरीतून येतो. सुमेध वडावाला यांनी रंगविलेल्या व्यक्तिरेखा आणि प्रसंगांची गुंफण विलक्षण पकड घेणारी आहे. या कादंबरीतील भाषा आणि शैलीची विविध रूपे मनोहारी आहेत. त्यामुळे

लेखक या कादंबरीतून थेटपणे जे काही सांगतो आहे. त्यापेक्षा बरेच काही अप्रत्यक्षपणे आपल्याला ' जाणवते आहे ' अशी भावना कादंबरी वाचताना होत राहते.

I) **वातावरण निर्मिती** :-

वातावरण निर्मिती हा कादंबरीचा महत्त्वाचा घटक समजला जातो. कादंबरीकार जी व्यक्तिचित्रणे साकारतो त्यांची पाळे - मुळे ही वातावरणात रुजलेली असतात. म्हणून त्यांच्या अतर्बाहय वर्तनाला चालना मिळते. कादंबरीकार कादंबरीला विशिष्ट आशय प्रदान करतो. त्या आशयासाठी विशिष्ट वातावरणाची निर्मिती करावी लागते. तसेच विविध प्रसंग व व्यक्तिरेखा प्रभावशाली करण्याचे काम वातावरण निर्मिती मुळेच होत असते. वातावरण म्हणजे काय ? हे स्पष्ट करतांना ना. सी. फडके लिहितात, " त्या, त्या प्रसंगाच्या वेळची निसर्गाची ठेवण आणि जवळच्या सजीव निर्जीव पदार्थाची मांडणी या दोन्हींचे मिळून वातावरण बनत असते."[२] याच्या आधारे या कादंबरीचा वातावरणाच्या दृष्टीने अभ्यास करण्याचे योजिले आहे.

**' देह जावो अथवा जावो ' या कादंबरीतील वातावरण निर्मिती** :-

प्रस्तुत कादंबरीतून महानगरीय जीवन चित्रित झाले आहे. त्यामुळे लेखकाने या जीवनाला अनुकूल असे वातावरण या कादंबरीतून निर्माण केले आहे. यामध्ये महानगरातील झोपडपट्टी, तुरुंगातील गलिच्छ वातावरण तर काही ठिकाणी पावसाळी वातावरण अशा विवध प्रकारच्या वातावरणाची योजना लेखकाने कथानकातून केली आहे.

त्यांच्या भाषिक आविष्कारातून हे वातावरण जिवंत पध्दतीने साकारले आहे. म्हणून कादंबरीच्या रंजकतेत अधिक भर पडते. याचा प्रत्यय प्रस्तुत कादंबरीतून येतो. सुमेध रिसबूड यांच्या लेखनाचे वैशिष्ट्ये म्हणजे ते झोपडपट्टी, सार्वजनिक ठिकाणे आणि सरकारी कार्यालयातले गलिच्छ आणि अस्वच्छ अशा वातावरणाचे चित्रण अचूकपणे शब्दातून मांडतात. अशा प्रकारचे चित्रण या ठिकाणी आपणास अनुभवास येते. नायकाला होणा-या त्रासाचे वर्णन पुढील प्रमाणे येते. - " इथल्या काळोखी, निर्मनुष्य जागेला, कुबट वासाला, अनिश्चिततेला सरावलो होतो. मात्र ते

स्वास्थ्य माझ्यासाठी औटघटकेचं ठरलं. संडासाला होऊ लागलं, तेव्हा संडासात गेलो, तो कुठे आहे हे मला विचारावं लागलं नाही. वासाच्या दिशेने गेलो. दाराबाहेर - समोर व्हरांडयाच्या दुसऱ्या कडेला संडास होता. तिथे गेलो आणि काही क्षणांपूर्वी वाटणाऱ्या त्या स्वास्थ्याचा लवलेशही उरला नाही.

आजवर कित्येक संडास मी पाहिले आहेत. सार्वजनिकही शेकडोंनी पाहिले असतील पण, संडासातल भांड आणि भोवतीची टीचभर जमीन यांच्यातल्या सीमारेषा नाहीशा करणारा, विष्ठेने अंतर्बाहय डबडबलेला असा संडास मी यापूर्वी पाहिला नव्हता. कुठे पाऊल ठेवायचं, कसं वसायचं आणि कुठे संडास करायचा असे प्रश्न मला पडले... मी नळ सोडला - सोडू लागलो तेव्हा वर्षानुवर्षाची त्याची मृतावस्था मला समजून आली. पाणी गळण्याची वा न गळण्याची पायरी तर नंतरची होती. कॉकची फिरकीच माझ्या दुदैवाइतकी घट्ट - चिरेबंदी होती. चिमटीत पकडलेला कॉक रागाने हिसडून दिला, तेव्हा कोपऱ्यातून वर - छताकडे चढलेला उभा गंजका पाईप हालत थरथरत राहिला. तर कुठेतरी कशालातरी आपटून त्याचा आवाज घुमत राहिला "[३]

अशा पध्दतीने लेखकाने तुरुंगातील गलिच्छ वातावरण शब्दाव्दारे मांडले आहे. त्यामुळे तुरुंगातील अस्वच्छतेविषयी आपणास कल्पना येते. सरकारी क्षेत्राचे असून देखील एवढया घाणेरडया वातावरणामुळे तेथील भ्रष्ट व्यवस्था आपल्या लक्षात येते. या भ्रष्ट व्यवस्थेचे चित्रणदेखील या कादंबरीतून येते. सामाजिक क्षेत्रातील भ्रष्ट वातावरण कशा पध्दतीने फैलावले आहे. याचे अचूकपणे सुमेध रिसबूड वर्णन करतात. म्हणजेच शासकीय, धार्मिक आणि नैसर्गिक वातावरणाप्रमाणेच सामाजिक क्षेत्रातदेखील भ्रष्ट वातावरण कसे असते याचा प्रत्येय आपणास पुढील प्रमाणे येतो.

" किडनी चोरीत जर डॉक्टरांचं रॅकेट सामील होत असेल, तर कोणतीही ' रक्तहीन ' चोरी हा व्यवसायाचा भाग समजायला हवा. ' मॅचफिक्सिंग ' मध्ये जर खुदद् खेळाडू सामील असतात. तर कोटयावधींची उलाढाल केली जाते. या कारणासाठी ' फिक्सिंग सिस्टिम ' बुकी आणि सटट्याप्रेमी हे दोषी धरण्याचं कारणच काय ? फारपूर्वी ज्ञानदान हे व्रत होतं. आता ज्ञान ही

बाजारमूल्य असणारी, विकत घेता येणारी वस्तू झाली आहे... ज्याला हायक्लास कोंचिग क्लासमध्ये जावून ज्ञान विकत घ्यायची इच्छा नसेल त्याला थेट क्वेश्चन पेपर विकत घेता येऊ शकतो, किंवा थेट मार्क विकत घेता येऊ शकतात."[४]

अशा किडलेल्या समाज व्यसस्थेचे वर्णन लेखकाने वरील प्रमाणे मांडले आहे. यामुळे कादंबरीतील गुन्हेगारी आणि भ्रष्टाचाराचे चित्रण आपल्या समोर येते. लेखकाच्या अभिव्यक्तीतून साकार झालेले हे वातावरण आपणास वैशिष्टपूर्ण अनुभव देते. तसेच लेखकाने या कादंबरीव्दारे त्यांच्या अभिव्यक्तीव्दारे सामाजिक भ्रष्ट वातावरणा बरोबरच नैसर्गिक वातावरणाचेदेखील चित्रण साकारले आहे. हे वातावरण लेखकाने अतिशय मनमोहक पध्दतीने साकारले आहे. याचा अनुभव आपल्याला पुढील प्रमाणे येतो.

" बाहेर वीज चमकून नाहीशी झाली. काही क्षणांच्या अंतराने तिचा चमकदार कशिदा आभाळात उमटत राहिला. राहिला असावा! आभाळाचा थोडाही अंश इथून थेट असा नजरेला पडत नव्हता. तरी काही क्षणांच्या अंतराने उमटणाऱ्या तिच्या चमकदार आवर्तनात इथून बाहेर दिसणारा मर्यादित परिसर लख्ख चांदीचा होऊन जात होता.इथे सकाळी मी ज्या वाटेवरून आलो होतो. ती वाट - वाट कसली, मातीचं पटांगण - त्यावेळी त्याचं स्वरूपही माझ्या लक्षात आलं नव्हतं, पण आता चमकणा-या विजांत ते पटांगण विलक्षणसं लाल - मातेरी रंगाचं दिसून नाहीसं होत होतं." [५]

अशा पध्दतीने लेखकाने प्रस्तुत कादंबरीव्दारे विविध प्रसंगांना अनुकूल अशी वातावरणाची निर्मिती करुन त्या - त्या प्रसंगांना जिवंतपणा प्राप्त करून दिला आहे. यामुळे त्यांच्या अभिव्यक्तीचे विशेष आपल्या लक्षात येते. त्यांच्या लेखनातून जे वातावरण निर्माण झाले आहे. ते वास्तव वाटावे इतके अचूकपणे मांडले आहे.

II ) <u>निवेदनपध्दती</u> :-

कादंबरीच्या कथानकात कलात्मकता यावी म्हणून लेखक एक विशिष्ट रचना कौशल्या वापरत असतो. म्हणजेच कथानक ज्या पध्दतीने साकारले जाते, त्या पध्दतीला कथानकाची 'निवेदन पध्दती ' असे म्हणतात. यात निवेदकाची भूमिका अत्यंत महत्त्वाची मानली जाते. या निवेदनातून कादंबरीचा पट वाचकांसमोर उलगडत जातो. कादंबरीचा हा घटक लेखकाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा असतो. कारण कादंबरीचा निवेदक हा स्वत: लेखकच असतो. त्यामुळे लेखकाला विविध पात्रांच्या मनातील भाव - भावनांचे, विचारांचे दर्शन घडविता येते. ही निवेदन पध्दती प्रथम पुरुषी, तृतीय पुरुषी, पत्रात्मक, दैनंदिनी स्वरूपात अशा विविध पध्दतीने साकारता येते. मात्र बऱ्याच कादंबऱ्यांची निवेदन पध्दती ही ' प्रथम पुरुषी ' असते. याचा प्रत्यय आपणास या कादंबरीतूनही येतो.

**<u>' देह जावो अथवा जावो ' या कादंबरीची निवेदन पध्दती</u>** :-

या कादंबरीतून लेखकाने ' प्रथमपुरुषी ' निवेदन पध्दतीचा वापर केला आहे. या कादंबरीतील नायक स्वत:चे आयुष्य जीवन आत्मकथेच्या स्वरूपात वाचकांना सांगतो आहे. आपल्या जीवनाची झालेली वाताहत आणि व्यथा तो या कादंबरीत आत्मकथेच्या रूपात लिहितो आहे. लेखकाने नायकाची आत्मकथा तीन टप्प्यात मांडली आहे. पहिला टप्पा नायक रात्रंदिवस लिहित राहतो तो, दुसरा टप्पा पोलिस कोठडीत लिहितो, तर तिसरा टप्पा हा आपटेबाई भेटल्यानंतर लिहितो. परंतु हे तीनही टप्प्यातील आत्मकथन एकत्र जोडता न आल्याने नायक शेवटच्या टप्प्यासह आपली आत्मकथा फाडून टाकतो. त्याची ही आत्मकथा जणू काही घर, उंबरठा आणि अंगण अशी योजना करून लेखकाने मांडली आहे असे वाटते. या आत्मकथेची सुरूवात म्हणजेच लेखकाची निवेदन पध्दती पुढील प्रमाणे पाहता येते -

> " माणसाला सर्वाधिक भीती कशाची वाटते ?"
>
> " स्वप्नांची ! "
>
> " स्वप्नांना कशाची भीती वाटते ? "
>
> " जाग येण्याची ! "

" जाग येणं, वास्तवाची काळीज कुरतडणारी जाणीव होत राहणं हा
जिवंतपणीचा मृत्यू आहे. "[६]

अशा पध्दतीने लिहीत नायक आत्ममग्नतेत आपल्या आत्मकथेला आकार देतो. यातून सुमेध रिसबूड यांची लेखनशैली आपल्या लक्षात येते. त्यांच्या लेखनातील चिंतनशीलता आणि भाषेची वैशिष्ट्ये या कादंबरीतून अनेक ठिकाणी दिसून येतात. नायकाच्या नीतिमुक्त, चाकोरीमुक्त आयुष्याचे चित्रण त्याच्या निवेदनातून चित्रित होते. पुढे लेखक नायकाच्या कुटुंबाविषयी लिहितानादेखील आत्मकथेचा ' फार्म ' वापरतात. हे निवेदनाचे वैशिष्टय मानले पाहिजे.

" आम्ही सगळे ' विजयनगरात ' राहत होतो. एकत्र कुटुंब. दोन खोल्यांचं घरं, कित्ती वर्षापूर्वीचा काळ, कॉलनीतल्या जवळपास सगळया बिऱ्हाडांनी गरिबी नुकतीच पार केलेली. किंवा त्यांची मध्यमवर्गीय अशी स्थिती, तो काळच कठीण- ( आताचा काळही आपल्यासाठी कुठे सोपा - सुखदायी आहे ? ) पण आस्था, आपुलकीच्या जोरावर सोसलं, निभावलं जायचं. दादा बेडेकरांच्या दुकानात होते. राघव सरकारी नोकरीत होता. वहिनी शिक्षिका त्यांना मूलबाळ नव्हतं. माई डबे करून दयायची, राघव घरात लागतील तेवढे पैसे दयायचा माईही दोघांची छान बडदास्त ठेवायची "[७]

अशा निवेदनातून लेखकाने नायकाच्या कुटुंबाची सामाजिक आणि आर्थिक स्थिती मांडली आहे. या ठिकाणी आपणास लेखकाच्या निवेदन पध्दतीच्या विचारांसोबत नायकाच्या आत्मकथेचाही एक निवेदन पध्दती म्हणून विचार करता येतो. नायक कधी संवादातून, लिखाणातून तर कधी आत्मचिंतनातून आपली आत्मकथा लिहितो आहे. अशा पध्दतीने रिसबूड यांनी निवेदनाची पध्दती प्रस्तुत कादंबरीत वापरली आहे. " आजचा दिवस विचित्र गेला. स्वतःच्या मुलाचा साखरपुडा झाल्यांचं कळल्यावर ज्याला दुःख होतं तो बाप आणि चाळीतल्या स्वतःच्या दोन खोल्यांच्या बदल्यात टॉवरमधला फ्लॅट मिळणार ही बातमी कळल्यावर परमदुःखी होणारा गृहस्थ अशी स्वतःची ओळख आज मला कळली. ही ओळख क्लेशदायी आहे. राघव जुने विषय काढतो. व्यसनाधीनता आली त्याची कारणं चिवडीत बसतो तेही क्लेशदायी आहे. अर्थात,

राघववर ठपका कशाला ठेवायचा ? त्याने ते चिवडलं नाही, तरी त्या कारणांचे विचार माझ्या मनात येतातच आणि क्लेश होतातच... बेडेकरांच्या दुकानात का होईना जर आपण इमानेइतबारे नोकरी करीत राहीलो असतो. तर राघवच्या शेजारच्या खोलीत मीठ भाकर खात सुखाने -हायलो असतो. पण माईला साऱ्याची घाई लागली होती. न संपणारी स्वप्नं ती दाखवत राहिली होती. "[१]

यातून लेखकाच्या चिंतनशीलतेचे दर्शन घडते. निवेदनातून चिंतनात्मक लेखन करणे हा देखील रिसबूड यांचा महत्त्वाचा गुण आहे. नायक आपल्या मनाची समजूत करतो आहे. आपणच आपल्या परिस्थितीला जबाबदार आहोत असे त्याला वाटते. नायकासारखीच इतर पात्रेदेखील निवेदनाच्या स्वरूपातच लेखकाने मांडली आहेत. याचे एक उदाहारण म्हणून आपण ' आपटेबाई ' या व्यक्तिरेखेचा विचार करू शकतो. आपटेबाई विषयीचे निवेदन लेखक पुढील प्रमाणे करतात. "मी रिटायर होण्यापूर्वीच हे गेले. हे नेहमी म्हणायचे, ' तू भूत योनीतलीच बाई आहेस. तुझ्या अतृप्त इच्छा तू इतरांकडून पूर्ण करुन घेण्याची संधी शोधत असतेस. ' खरं आहे ते ! आता तुला सांगते, त्या काळात इंग्रजीतून एम.ए. झालेली मी आय.ए.एस ला पहिल्या फटक्यात सिलेक्ट झाले होते. इंटरव्हयूनंतर मसुरीला ट्रेनिंगला जायचं होतं पण आईनं विरोध केला. त्या काळात कुणी मुली तिकडे जायच्या नाहीत. म्हणून विरोध केला आणि डॉक्टर आपटयांशी माझं लग्न लावून दिलं. उभं आयुष्य ते अपूर्ण, ठुसठुसतं स्वप्न मनात घेऊनच मी शाळेत शिकवत आले. माझ्या एखादया तरी विद्यार्थ्याने आय.ए.एस व्हावं अशी इच्छां धरून शिकवत आले. "[१]

स्वतःच्या इच्छेविरुध्द जीवन जगावे लागल्यामुळे आपटेबाई परिस्थितीला कशा सामोरे जातात. आणि आपल्या मनाचे सांत्वन कशा पध्दतीने घालतात. याचा अनुभव या निवेदनातून आपणास लक्षात येतो. या उदाहरणातून आपले असे लक्षात येते की सुमेध वडावाला यांची निवेदन पध्दती ही प्रथमपुरुषी आणि वाचकाभिमुख आहे. वाचल्यानंतर कादंबरीचा आशय लगेच लक्षात येतो. कादंबरीतील पात्र हे आत्मचिंतनातून आपल्या परिस्थितीचा विचार करताना दिसतात. म्हणजेच लेखकाच्या निवेदन पध्दतीला चिंतनशीलतेचा स्पर्श झालेला आहे.

III) **भाषाशैली** :-

कादंबरीच्या इतर घटकांपैकीच भाषा हा देखील एक महत्त्वाचा घटक असतो. कादंबरीतील निवेदनासाठी सर्वस्वी भाषाच वापरली जाते. वाचकांपर्यत पोहचण्यासाठी लेखक भाषेचा माध्यम म्हणून उपयोग करतो. याद्वारे वाचकांपर्यंत अनेक विचार पोहचत असतात. कादंबरीतील जीवन सादरीकरणासाठी भाषा हे महत्त्वाचे साधन आहे. भाषेमुळे कलाकृतीचा आशय समजण्यास मदत होते. ती अर्थवाही स्वरूपातून कलाकृतीत येते. लेखकाच्या सामाजिक, सांस्कृतिक जीवनाचा प्रभाव त्याच्या भाषाशैलीवर होत असतो. कादंबरीतील चित्रण प्रभावी व आकर्षक होण्यासाठी लेखक विशिष्ट प्रकारची भाषाशैली वापरत असतो. जसा भाषेचा दैनंदिन जीवनात व्यवहारासाठी माध्यम म्हणून वापर केला जातो, त्याप्रमाणे वाङ्मयनिर्मितीतदेखील भाषेचा वैशिष्टपूर्ण रीतीने वापर केला जातो. म्हणून तिची दोन रूपे मानली जातात. एक बोली आणि दुसरी लिखित स्वरुपातील भाषा अशी रूपे आहेत. म्हणजेच भाषेशिवाय जसा व्यवहार होऊ शकत नाही. तशीच वाङ्मयनिर्मितीदेखील होऊ शकत नाही. म्हणून भालचंद्र नेमाडे यांनी साहित्याला ' भाषिककृती ' असे नाव दिले आहे. या साहित्यकृतीतून लेखक अनेक पात्रे निर्माण करीत असतो. त्या पात्रांकरवी भाषिक रूपेही लेखकाला निर्माण करावी लागतात. त्यामुळे प्रत्येक पात्राचे वेगळेपण सिद्ध होत असते. याच्या अनुषंगाने आपणास प्रस्तुत कादंबरीच्या भाषाशैलीचा विचार करावयाचा आहे.

**' देह जावो अथवा जावो 'या कादंबरीची भाषाशैली** :-

प्रस्तुत कादंबरीतून लेखकाने भाषेची विविध रूपे वापरली आहेत. हेच या कादंबरीचे वैशिष्ट्ये मानले पाहिजे. या कादंबरीच्या भाषेतून लेखकाने संवाद, काव्यात्मकता, उपमा, वाक्प्रचार, प्रतिमा, प्रतिकांचा वापर, अन्यभाषेचा वापर आणि प्रसंगानुरूप शिव्यांचा वापर देखील या कादंबरीच्या भाषाशैलीचे विशेष म्हणून येतात. ही कादंबरी महानगरीय पार्श्वभूमीवर निर्माण झाल्यामुळे तिथल्या सामाजिक व सांस्कृतिक घटकाला अनुरूप अशी भाषा लेखकाला निर्माण करावी लागली आहे.

संवादाच्या माध्यमातून लेखकाने हिंदी व इंग्रजी भाषा वापरली आहे. तर काव्याची आवड असलेल्या तरुणाच्या माध्यमातून लेखकाने या कादंबरीतून कवितांचा वापर केला आहे. तर

गुन्हेगार जगतात, जगणाऱ्यांच्या तोंडून शिव्यांच्या वापरातून उठावदारपणा आणला आहे. तर वेगवेगळया उपमा, वाक्प्रचार, प्रतीक, प्रतिमांचा वापर करून कादंबरीचे वाङ्मयीन मूल्य वाढविले आहे. सुमेध रिसबूड यांची भाषाशैली ही आलंकारिक, काव्यमय व वास्तव स्वरूपात या कादंबरीतून अवतीर्ण झाली आहे.

अ) **संवाद** :-

कथानकात रंगत वाढविण्यात संवादाचा उपयोग होतो. या संवादामुळे कथानकाला गती प्राप्त होते. आणि विकसितही होते. पात्रांच्या स्वभावधर्माची वाचकांना संवादामुळे माहिती होते. तसेच गुणदोषही समजण्यास मदत होते. त्यामुळे कादंबरीच्या निवेदनात संवादाचा वापर केला जातो. या भाषिकरूपाचा वापर अनेक साहित्यातून झालेला आहे. प्रस्तुत कादंबरीतदेखील संवादाचा वापर केला आहे. प्रसंगानुरूप संवादाची निर्मिती करणे हा रिसबूड यांच्या लेखनाचा विशेष गुण मानला जातो. याचा प्रत्यय आपणास पुढील संवादातून येतो -

" चार दिवसांचा उशीर ? " मी तिरकसपणे विचारलं ते मनावर मुळीच न घेता राघव म्हणाला,

" चार दिवसांचे पैसे तुला देऊन ठेवले होते ना ? "

" तुला वसईला जायचं होतं त्याची तजवीज म्हणूनच ना ? लाडू तिथलेच असतील कदाचित ! "

" तुझा संशयी स्वभाव तस्साच कायम आहे, नरसू...!असे.. "[१०]

अशा संवादातून वाचकांसमोर एक स्पष्ट चित्र उभ राहतं. या संवादामुळे आशय लगेच लक्षात येतो. वरील संवाद हा नायक आणि त्याचा सावत्र भाऊ यांच्यातील आहे. नायक त्याच्याजवळ आपल्या आयुष्याचे गाऱ्हाणे मांडतो आहे. तसेच आणखीनही काही संवादांची निर्मिती करून लेखकाने कादंबरीचे वाङ्मयीन मूल्य वाढविले आहे. कुटुंबातील व्यक्तीशिवाय इतर पात्रांशी नायकाचे संबंध होते. त्यांच्याशी नायकाचे संवाद होत असत. त्यापैकी नरसूचा मित्र सोमा याच्याशी झालेल्या संवादाविषयी आपण विचार करु -

" भटा, तू हे मान्य करु नकोस ! "

" मान्य करणारा आणि न मान्य करणारा मी कोण रे ? "

" का ? तुज्या बापाची खोली आहे. "

" पण त्यांनी ती माझ्या बायकोच्या नावावर केली. "

" आसेल, आपण हारकत घ्यायची. कोरटात दावा दाखलं करायचा.पोलिसात फिर्याद ठोकायची, खोटा कागद केला म्हणून !" "कुणी खोटा कागद केला, म्हणायचं ?"

" संगनमत तुजा भाव, त्यांची बायको, नि तुजी बायको !

" छे ...! हे...हे " मी असह्यपणे उदगारलो... "[११]

अशा विविध प्रसंगाना लेखकाने संवादाचे रूप दिले आहे. सोमा त्याच्या बेघरावस्थेची जाणीव करून देतो. परंतु नरसूला या सर्व गोष्टीत अजिबात लक्ष दयायला आवडत नाही. यामुळे आपणास संवादाविषयीचे महत्त्व लक्षात येते.

ब) **काव्यपंक्तींचा वापर** :-

प्रस्तुत कादंबरीत निवेदनातून लेखकाने विविध काव्यपंक्तींचा वापर केला आहे. साहित्यकृतीतून काव्यात्मकतेचा वापर करणे हे रिसबूडांच्या भाषाशैलीचे वैशिष्टय आहे. यामुळे साहित्यकृतीला रसिकता प्रदान होते. वाचकाची आवड खिळून राहते. या ठिकाणी आपण या कादंबरीत आलेल्या काव्यात्मकतेचा विचार करू. नायक आणि तुरुंगातील तरुण यांच्यात काव्यात्मकतेची आवड लेखकाने रुजविली आहे. त्यामुळे या ठिकाणी काव्यात्मकतेचा वापर करण्यात आला आहे,

" गाऊ लागले मंगल पाठ - सृष्टीचे गाणारे भाट,

वाजवी सनई मारुतराणा - कोकिळ घे तानावर ताना,

नाचू लागले भारव्दाज - वाजवितो निर्झर पखवाज !.. "[१२]

हया बालकवींच्या कवितेतील ओळी लेखक उद्धृत करतो. अशा प्रकारे प्रस्तुत कादंबरीतील विलक्षण तरुण काव्य गाऊ लागतो. त्याला गाण्यांच्या भेंडया खेळण्याची हौस

असल्याने नायकासोबत तो हा खेळ खेळतो. त्याच्या काव्याला प्रत्युत्तर देण्यासाठी नायक पुढील अभंगाचे गायन करू लागतो-

" जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले !

तोचि साधू ओळखावा, देव तेथेचि जाणावा ! "[१३]

अशाप्रकारे भेंडयांच्या खेळातून शब्दाला शब्द जुळणांऱ्या काव्यांची योजना सुमेध रिसबूड यांनी या कादंबरीतून केली आहे. यातून त्यांची काव्यविषयक जाण आणि आवड आपल्या लक्षात येते. नायकाच्या उदासीन, पराधीन जीवनाची जाणीव तरुणाला होते. त्याच्याबद्दल एक विशेष आदर तरुणाच्या मनात निर्माण होतो. म्हणून तो नायकाच्या सांत्वनासाठी पुढील ओळी गाऊ लागतो -

" दोन ओंडक्यांची होते सागरात भेट!

एक लाट तोडी दोघां पुन्हा नाही गाठ ,

क्षणिक तेवि आहे बाळा, मेळ माणसाचा,

पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा...! "[१४]

अशा काव्यपंक्तीमुळे नायकाला आपल्या पराधीन जीवनाची जाणीव सतावत राहते. आणि दुःखाश्रू वाहत राहतात. यानंतरच्या काव्यातून नायकाच्या प्रतिभाशक्तीचे दर्शन लेखक घडवितात. कारण एखादया प्रश्नाचे काव्यात्मक उत्तर देऊन आपटेबाईना आश्चर्याचा धक्का देणारा नरसू याठिकाणी आपणास भेटतो. कादंबरीला रसाळ बनवत लेखक अनेक काव्यांचा उचित वापर याठिकाणी करतो -

" घनपाठी मोराच्या,

पोलीस तो चोराच्या !

मोर वळूनी पाहि घना,

चोर पळूनी जाई घना !

' वनबंधू ' दोघेही !

पकडण्यास दोघांही -

चोरावर मोर, चोरावर मोर ! "[१५]

अशा काव्यात्मकतेचा वापर लेखकाने संपूर्ण कादंबरीतून केला आहे. प्रसंगानुरूप काव्याचा वापर करणे हा सुमेध रिसबूड यांच्या वाङ्मयीन अभिव्यक्तीचा विशेष गुण आहे. त्यासाठी एखादया कवितेच्या अथवा वेळप्रसंगी स्वत: काव्याची निर्मिती करून साहित्यकृतीतून वापरत असतात. त्यामुळे कादंबरी वाचनात विशेष अभिरुची निर्माण होत असते.

क) **उपमा, वाक्‌प्रचार, म्हणी, प्रतिमा - प्रतीकांचा वापर** :-

भाषेला जिवंतपणा येण्यासाठी म्हणी, वाक्‌प्रचार, उपमा व प्रतिमा - प्रतीकांचा वापर लेखक प्रभावीपणे करत असतो. आपल्या मनाच्या विविध अवस्था व्यक्त करण्यासाठीदेखील याचा उपयोग कादंबरीतून होतो. त्यामुळे कादंबरीचा आशय थेटपणे वाचकांपर्यंत पोहचत असतो. या सर्वांचा योग्य ठिकाणी वापर करुन कादंबरीला विशेष स्थान प्राप्त होते. म्हणून अनेक कादंबरीकार यांचा योग्य ठिकाणी वापर करुन कादंबरीचे वेगळेपण सिध्द करतात. प्रस्तुत कादंबरीत देखील अनेक ठिकाणी या भाषिक वैशिष्टयांचा वापर लेखकाने प्रभावीपणे केला आहे.

" गल्ल्यातल्या नोटांच्या नवेपणाचा वास - त्या जीर्ण झाल्या तरी तस्साच मोहक - नशाबाज असतो."( पृष्ठ २८ )

" राघव चार दिवसांत आला नव्हता म्हणून पैशाचा खडखडाट होता " ( पृष्ठ ३१)

" सुकुमारला तिने खुशाल ' पांढऱ्या पायाचा ' ठरवलं होतं. ( पृष्ठ ३३)

" गुत्त्यावरुन आल्यावर आसरा शोधत येणारा दिवाटणा एवढचं अस्तित्व उरलं होतं आपलं. " ( पृष्ट ३३)

" पण नशेच्या मृगजळामागे नित्य नव्या आशेने आपलं धावणं काही थांबलं नाही. " ( पृष्ठ ३४)

" माणसांनी बागेप्रमाणे**आप**ल्यालाही वाळीत - टाकलं आहे "  ( पृष्ठ ३८ )

" तो क्षण मला आठवला आणि तिच्या बाजूच्या कळयांचा पांढरा,फिका हिरवा  डोंगर मला अस्वस्थ करत राहिला. सुगंधाबरोबर येणाऱ्या आठवणीही सुगंधी असतात असं नाही. " ( पृष्ठ ४० )

" कानांच्या कडांवर केसांच्या दाट रेघा होत्या. उगवून वर उभ्या राहिलेल्या,  ताठरलेल्या केसांची जशी राठशी गवतपातीच ! " ( पृष्ठ ४१ )

" ते राघवने पाहिले आणि हतबलतेने त्याचा चेहरा पिळवटून गेला " ( पृष्ट ४४ )

" काडी बारीकपणा जाऊ देच देहाचा, पण बटबटीत होऊन डोळे एवढे बाहेर आले आहेत की, बोलता बोलता ते टपकन खाली कोसळतील की काय अशी भीती वाटावी. " ( पृष्ठ ५५ )

" काजव्यांची रेघ उघडया डोळयापुढे शिस्तीत चमकून लुप्त होत गेली. आपण कोसळून पडू की काय अशी भीती वाटेपर्यंत काजवे चमकत होते. "( पृष्ट ६८ )

" या माणसाचं काळीज सशाचं आहे. याला कशावर्न पकडून आणलयं सांगाल ? " ( पृष्ठ ८०)

" सुकुमारचा अश्राप निरागस चेहरा मला आठवत राहिला. "  ( पृष्ट ९४ )

" पैसे मोजून हातपाय हालवण्यापेक्षा पैसे कमवण्यासाठी हातपाय हालव " ( पृष्ट ९६ )

" शेण खाण्याला प्रतिष्ठा दयायची ठरवली तर ते फक्त पांढ-या गायीचे असायला हवं, लाल - काळया गाईचं चालणार नाही. अशी कंडिशन ही मूर्खपणाची आहे. शेण खाण्याच्या प्रतिष्ठेतही सर्वांना समान संधी मिळायला हवी . "  ( पृष्ठ ९८ )

" त्या खुणाही त्याच्या चेहऱ्यावरून, शब्दातून पुसून गेल्या आणि काही क्षण नजर जणू गोठून गेली. " ( पृष्ट १०४ )

" रस्ता हा दाही दिशांनी खुला असणारा पण त्यातून सुटका होऊन  न शकणारा विचित्र असा सापळा आहे. " ( पृष्ठ १०५ )

" त्याच्या नजरेतलं एक वेडं कोकरू - वेडं असतं तरी चाललं असतं, ते बेफाम झाल होतं, म्हणून ते वेडं कोकरू "  ( पृष्ठ १३० )

" सरळसोट उभं कडे वाटावे अशा उंच भिंतीच्या स्तब्ध रेखीव इमारती त्यांच्या त्या कडयांवरूनच जणू काही विजा खाली उतरत होत्याआणि खालच्या पुरसबंदीवर लोळण घेऊन उडून जात होत्या " ( पृष्ठ १३० )

" घर सोडल्यानंतरच्या इतक्या वर्षात मातीचा असा ओला, अलवार, शांतरसात भिजवल्याप्रमाणे येणारा मंद तृप्त वास जणू मी अनुभवला नव्हता " ( पृष्ठ १४१ )

" मटणवाल्याकडे कोंबडया नेताना ट्रकात कशा भरून नेतात... अशी परिस्थिती असते इथल्या या कोठडीत कधी कधी ! " ( पृष्ठ १४२ )

" पण आवळया भोपळयांची मोट कधी जाते का बांधली ? " ( पृष्ठ १४३ )

" ओठांनी हास्याचा जणू बलात्कार केलेले दात उघडेवाघडे करत फरेरा म्हणाली, " ( पृष्ठ १५८ )

" पाणीदार मोती या शब्दाचा अर्थ मी वर्गात विचारल्यावर तू त्या बाईच्या नथीतले मोती सांगितले होतेस. " ( पृष्ठ १६८ )

" कोपऱ्या कोपऱ्यावर उभ्या असलेल्या वृत्तपत्रांच्या छपरी लायबऱ्या माझ्या डोळयापुढे हसत राहिल्या. आणि पेपर गलिच्छपणे फडफडत राहिले. " ( पृष्ठ १७० )

" नृसिंह जोशी, तुमच्या पोटाची गरज,क्षुधा ही कचराकुंडीच्या गरजेच्या बरोबरीची आहे. " ( पृष्ठ १८३ )

अशा विविध वाक्यातून लेखकाने कादंबरीचे वाङ्मयीन मूल्य वाढविले आहे. यात लेखकाने उपमा, वाक्प्रचार , प्रतीक, प्रतिमांचा भरपूर वापर केला आहे. त्यामुळे कादंबरीचे वेगळेपण सिध्द होते.

ड) **अन्य भाषेचा वापर** :-

कादंबरीच्या निवेदनाची प्रमुख भाषा मराठी असली तरी पात्रा - पात्रानुसार कधी ती लेखकाला बदलावी लागते. त्या - त्या वातावरणानुसार भाषेची निर्मिती करावी लागते. त्यात अन्य भाषेचादेखील वापर केला जातो. म्हणून लेखकाने या ठिकाणी मराठीव्यतिरिक्त हिंदी व इंग्रजी भाषेचादेखील वापर कला आहे, व्यक्तिपरत्वे भाषा निर्माण करणे हे सुमेध रिसबूड यांचे भाषिक वैशिष्ट्य मानले पाहिजे.

**हिंदी भाषेचा वापर** :-

" पहेचाना क्या.. ?"

" हमारेसे बात कर्ना मना है क्या...?"

" वो पीनेकू मर्दानगी लगती है ! बेवडे अब तक रहा है क्या तू मरद "( पृष्ठ ३९ )

" क्यू ? हम पैसा देनेवाले नै है क्या ?"

" मैने कुछ पूछा क्या तेरेकू ?"

" पुछा नही पण देखा ऐसे के... हमारे शेटको समझेगा ना, तो वो ही खुद आयेंगा इधर !"

( पृष्ठ ५७ )

" पुलिसवाला देने को बोलां "

" इतनी जल्दी ? क्यू ? "

"ये दवा लेके आ !" ( पृष्ठ १३७ )

" कानून घटना देखती है ! घटना के कारण देखती है क्या? " ( पृष्ठ १४६ )

**इंग्रजी भाषेचा वापर** :-

" दि नेचर्स ऑटोबायोग्राफी ! बी अ पार्ट ऑफ इट ! " ( पृष्ठ 23 )

" लेट इट बी एन्जॉईड बाय ऑफ एनिमीज !" ( पृष्ठ २३ )

" यु शुड राईट ऑटोबायोग्राफी !" ( पृष्ठ २५ )

" इट इज दि मॉरल ऑफ दि स्टोरी ! विदाऊट एनि स्टोरी! दे जस्ट इंडिकेट समथिंग ! "

" आयफील यू आर सरफ्राईज्ड ! " ( पृष्ठ ७५ )

" इट्स ॲन इन्टरेस्टिंग कॉमेन्टं ! " ( पृष्ठ ९६ )

" प्रॉपर कम्युनिकेशन इज द सीक्रेट ऑफ सक्सेस ! रादर ॲश्युअरन्स ऑफ सक्सेस !"

( पृष्ठ ११५ )

" लेट मी एन्जॉय माय डेथ इनोसन्टली ॲन्ड नॅचरली !" ( पृष्ठ १७६ )

इ ) **शिव्यांचा वापर** :-

दैनंदिन जीवनात व्यवहारासाठी भाषेचा वापर होत असतो. त्यात संवादातून अनेक वाक्यांची देवाण - घेवाण होते. या वाक्यातून बऱ्याच वेळा शिव्यांचा वापर केला जातो. या शिव्या त्या पात्रांच्या सामाजिक स्तरानुसार भाषेतून येतात. प्रस्तुत कादंबरीतून महानगरीय जीवन चित्रित झाल्यामुळे विविध पात्रांच्या मुखातून अनेक प्रकारच्या प्रसंगानुरुप शिव्यांचा वापर लेखकाने केला आहे. या भाषिक वैशिष्टयाचा या ठिकाणी विचार करायचा आहे .

" छिन्नाल औरत...! " ( पृष्ठ ४२ )

" स्साली सगळी माणसं आपल्याकडे अविश्वासानेच पाहत असतात एक जात ! "

( पृष्ठ ५३ )

" रांडेनं नवरा खाल्ला म्हताना घर्च्यांनी हाकलून दिलं नि ही बाई तव्वापासून हिते मुंबईत आली. " ( पृष्ठ ५६ )

" विलायती दारु याला छिनाल बाईसारखी वाटते. ( पृष्ठ ५६ )

" पुढचा रस्ताभर सोमा मला ' निकम्मा ' म्हणून हिणवत राहिला. " ( पृष्ठ ६१ )

" उलटा विचारतौस काय रे भोसडीच्या...! " ( पृष्ठ ६६ )

" कुत्र्या बाकावर कुणी बसायला सांगितलं ? " ( पृष्ठ ७१ )

" ए तुज्या आयला ऽऽ मी येवू आत ? सककाळी ऐवडा बुकल्ला तरी गांडचर्बी तश्शीच हाय तुजी ! " ( पृष्ठ ७७ )

" बाजूच्या सेल मधला डुक्कर बघ. " ( पृष्ठ ८२ )

" लय हरामी हैत पोटट्‌भी " ( पृष्ठ १३८ )

" मेल्या पी ! पण चाकणाभी खाशील का नाय ? " ( पृष्ठ १५६ )

" प्यायले की तोंडातून गटारच वाहू लागणार. भादव्यावर आलेले साले " ( पृष्ठ १५९ )

" तेरा हात चलता नही स्साले ! " ( पृष्ठ १८२ )

अशा विविध प्रकाराच्या शिव्यांचा वापर करून लेखकाने पात्रांचे राग, संताप, नकार असे भाव व्यक्त केले आहे. या शिव्यांचा वापर गुन्हेगारी जगतातील व्यक्ती, पोलीस, झोपडपट्टीतील अनेक बायका, पुरुष इत्यादी लोकांच्या संवादातून कादंबरीतून आला आहे. यामुळे प्रस्तुत कादंबरीला वास्तवतेचे परिणाम लाभले आहे.

**समारोप** :-

या प्रकरणात आपण प्रस्तुत कादंबरीच्या वाङ्मयीन विशेषांचा अभ्यास केला. यात कादंबरीच्या कथानकाची मांडणी, व्यक्तिरेखाटन, वातावरणाची निर्मिती, निवेदन पध्दती आणि भाषाशैली इत्यादी कादंबरीच्या विविध घटकांच्या आधारे या कांदबरीचा अभ्यास केला आहे. कारण या प्रकरणात कादंबरीचे वाङ्मयीन विशेषाचा अभ्यास करण्याचे योजले होते.

सुरूवातीला कादंबरीतील वातावरण निर्मितीचा अभ्यास या प्रकरणातून केला आहे. वातावरणामुळे कादंबरीच्या आशयाकडे वाचकांचे विशेष लक्ष जाते. म्हणून या कादंबरीतून लेखकाने निवेदनाव्दारे कशा प्रकारे वातावरणनिर्मिती केली आहे. याकडे विशेष लक्ष दिले. तसेच कादंबरीच्या ' निवेदन पध्दती ' विषयी देखील या प्रकरणातून आपण अभ्यास केला. त्यात ' प्रथमपुरुषी ' निवेदन पध्दतीव्दारे लेखकाने नायकाची आत्मकथा मांडली आहे. अशा स्वरूपाचे वर्णन या निवेदनाव्दारे कादंबरीतून आले आहे.

या निवेदनासाठी लेखक विशिष्ट भाषेचा वापर करत असतो. या भाषेचा देखील आपण तिच्या विविध वैशिष्ट्यांच्या आधारे विचार केला. त्यात संवाद, काव्यात्मकता, म्हणी, वाक्प्रचारांचा वापर, इतर भाषेचा प्रसंगानुसार केलेला वापर, आणि पात्रांनुसार वापरलेल्या शिव्यांचा वापर याचा आपण या प्रकरणातून वैशिष्टयपूर्ण रीतीने अभ्यास केला आहे. म्हणजेच प्रस्तुत कादंबरीच्या वाङ्मयीन विशेषाचा अभ्यास या प्रकरणातून आपण केला. त्यातून लेखकाच्या वाङ्मयीन अभिव्यक्तीविषयीचा आपणास परिचय होतो आणि कांदबरीचे मूल्य वाढते असे म्हणता येईल.

# संदर्भग्रंथ

| ग्रंथकार | | ग्रंथनाम |
|---|---|---|
| १. भालचंद्र नेमाडे | : | साहित्याची भाषा, साकेत प्रकाशन - औरंगाबाद. प्रथम - आवृत्ती १९८७, पृष्ठ ( ९ -१० ) |
| २. ना.सी. फडके | : | प्रतिभा साधन, प्रकाशक : दा.ना.मोघे, स्कूल ॲन्ड कॉलेज बुकस्टॉल, कोल्हापूर, व्दितीय आवृत्ती - १९३८ ( पृ.१४५ ) |
| ३. सुमेध वडावाल ( रिसबूड ) | : | ' देह जावो अथवा जावो ', नवचैतन्य प्रकाशन, मुंबई. पहिली आवृत्ती, २००५ ( पृ.क्र.७६ - ७७ ) |
| ४. तत्रैव | : | पृ.९८ |
| ५. तत्रैव | : | पृ.१२६ |
| ६. तत्रैव | : | पृ.१९ |
| ७. तत्रैव | : | पृ.२७ |
| ८. तत्रैव | : | पृ.६२ |
| ९. तत्रैव | : | पृ.१७१ |
| १०. तत्रैव | : | पृ.४४ |
| ११. तत्रैव | : | पृ.६० |
| १२. तत्रैव | : | पृ.८५ |
| १३. तत्रैव | : | पृ.८५ |
| १४. तत्रैव | : | पृ.८७ |
| १५. तत्रैव | : | पृ.११०-१११ |